# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/10/2023 (शनिवार) सकाळ


## साहित्य चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा १४ मैल येथे फिर्यादी नामे— रवी अरुण आसटकर, वय ४४ वर्ष, रा. प्लॉट नं. ७९, म्हाळगी नगर, नागपुर हे दिनांक ११/१०/२०२३ रोजी त्याचे ट्रक क्र. एम. एच.— ४९/ए.टी. २८६६ हा ट्रक घेउन त्यामध्ये कंपनीतील साहीत्य सील करुन अमरावती येथे जाऊन सदर मुद्‌देमाल खाली केला व ज्या ठिकाणी मुद्‌देमाल खाली केला त्याच कंपनीतुन पुन्हा दुसरे साहीत्य ऑनलाईन पार्सल एकुण ४१२ इतके लोड केले नंतर दिनांक ११/१०/२०२३ रोजी २३/०० वा. फिर्यादी हे अमरावतीवरून निघुन त्याचे ट्रकने १४ मैल येथे दिनांक १२/१०/२०२३ रोजी रात्री ०१/३० वा. चे दरम्यान पोहोचले असता त्यांनी त्यांचा ट्रक रोडचे बाजुला लावुन चहा नास्ता करायला हॉटेलवर गेले असता थोडया वेळातच परत येउन पाहीले असता गाडीच्या पल्ल्याचे सील तुटलेले दिसले. यानंतर फिर्यादीने आपले वाहन गोंडखैरी येथील कंपनीमध्ये त्याच रात्री ०१/५० वा. आणले तिथे डयुटीवर हजर असलेले मनिष दंढारे यांना सांगुन गाडीचा दरवाजा उघडुन गाडीत असलेले साहीत्य लिस्टप्रमाणे चेक केले तर ४१२ असलेल्या मालापैकी लिस्टप्रमाणे ७१ पार्सल मधील १) एल ए डी २) घडी ३) बुट चप्पल ४) लाईटर चमचे ५) पत्रव्यवहार अशाप्रकारचे पार्सल किंमती अंदाजे १,०५,२५०/— रुपयाचा मुद्‌देमाल लिस्ट प्रमाणे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रदीप गायकवाड मो. नं. ७९७२०४३२५४ हे करीत आहे.

## लोखंड चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा नेरला येथे फिर्यादी नामे— प्रशांत गोपाल भिवगडे, वय ३२ वर्ष, रा. नेरला ता. मौदा जि. नागपुर याचे घराजवळील गोठयाचे बाजुला ठेवलेले ट्रॅक्टरचे सामान १) एक लोखंडी कल्टीवेटर किंमती २५,०००/— रू. २) एक लोखंडी पाटी किंमती अंदाजे २,०००/— रू. ३) एक दतार किंमती ३०००/— रू. असा एकुण ३०,०००/— रू. चा मुद्‌देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के मो. नं. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर